MHSN090013082025

सं.फौ.ख.क्र.५४१/२०२५
सरकार वि. संजय
निशाणी ०९

## न्या य नि र्ण य

(जाहीर दिनांक ०१ एप्रिल २०२६)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे चालविणेत आला.

२. अभियोगपक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा मिळून न आल्याने आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा अधिनियम, २०२३ चे कलम ३५१(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविले नाही.

३. अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ श्रीमती फोंडके व आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.व्ही.जी.शिंदे यांचा युक्तीवाद ऐकला. या प्रकरणातील तथ्ये व अभिलेखावरील पुरावा यानुसार माझे निष्कर्षास खालील वादप्रश्न उपस्थित झाले. कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे –

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष शाबीत करतो का, दिनांक ०९.०३.२०२५ रोजी रामोशी वाडा, राजापूर, ता.तासगांव, जि.सांगली येथे आरोपी हा त्याच्या ताब्यात एका वायरी पिशवीत देशी दारु संत्राच्या १८० मिली क्षमतेच्या ३५ सिलबंद बाटल्या विनापरवाना, बेकायदेशिररित्या, विक्री करण्याच्या उद्देशाने त्याच्या कब्जात बाळगत असतांना मिळून आला ? | **नकारार्थी** |
| २. | आदेश कोणता ? | **आरोपीस निर्दोषमुक्त केले.** |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ –**

४. घटनास्थळ आणि जप्ती पंचनामेवरील पंच शशिकांत (अ.सा.क्र.१) आणि अर्जुन (अ.सा.क्र.२) यांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. अभियोगपक्षास सदरील साक्षीदाराच्या पुराव्यातून आरोपीविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा मिळून आला नाही. घटनास्थळ व जप्ती पंचनामेवरील पंच शशिकांत (अ.सा.क्र.१)आणि अर्जुन (अ.सा.क्र.२) यांनी अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने व जप्त मुद्देमालातील नमुन्यांचा रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल अभिलेखावर दाखल न केल्याने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करणेत आला. त्यामुळे फिर्यादी, इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व तपासी अधिकारी यांना तपासले नसल्याने फिर्याद, घटनास्थळ व जप्ती पंचनामा, जप्त मुद्देमालातील नमुने प्रयोगशाळेत पाठविल्याबाबतचे पत्र शाबीत झाले नाहीत. वर नमूद कारणांचा विचार करता आरोपीने तथाकथित गुन्हा केला किंवा कसे याबद्दल साशंकता निर्माण होते. त्यामुळे मी वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविते.

**वादप्रश्न क्र.२ –**

५. वरनमूद चर्चा, निरीक्षण आणि निष्कर्ष पाहता अभियोगपक्ष आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करणेस असमर्थ ठरला त्यामुळे आरोपी निर्दोषमुक्त होणेस पात्र आहे त्यामुळे वादप्रश्न क्र.२ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

(१) आरोपी संजय संभाजी घळगे याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केल्याचे आरोपातून भारतीय नागरीक सुरक्षा अधिनियम, २०२३ चे कलम २७८(१) प्रमाणे निर्दोषमुक्तता केली.

(२) आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका (बंधपत्र) व जामीनकदबा रद्द केला.

(३) आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा अधिनियम, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे र.रु.२५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र लिहून द्यावे.

(४) जप्त मुद्देमाल देशी दारु रॉयल संत्राच्या १८० मिली क्षमतेच्या ३५ सिलबंद बाटल्या व एक वायर पिशवी अपील कालावधीनंतर नाश करण्यात याव्यात.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला)

BHANUPRIYA RAHUL AVACHARI DURGAWADE
Digitally signed by BHANUPRIYA RAHUL AVACHARI DURGAWADE
Date: 2026.04.04 19:22:29 +0530

ठिकाण - तासगांव **(श्रीमती बी.आर.आवचारी दुर्गवडे)**

दिनांक - ०१.०४.२०२६ **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी तासगांव.**

**Certificate**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original judgment/order;

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.A.Narale. |
| Name of Court | : | Civil Judge Jr.Dn., Tasgaon. |
| Date | : | 01.04.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding officer on | : | 04.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 04.04.2026 |